ANNEXURE- + (MARATHI)

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

## SUB-REGIONAL OFFICE – KALYAN III

Tel: 95-251-2310167/212
Fax: 2310192
Website: http://mpcb.gov.in
E-mail: srokalyan3@mpcb.gov.in

Siddhivinayak Sankul
3rd & 4th Floor, Near Oak Baug,
Kalyan (West), Dist. Thane

Date:- 24/12/2019

NO. MPCB/SROK3/ 585

To,
The District Collector,
Collector Office, Palghar.

**Sub**: - Minutes of meeting Public Hearing of M/s. Bhartiya Metacast Pvt. Ltd. Gut No. 179, 180, 182, 272, 273, 274 of Ghonsai (Met Naka) village, Tal. Wada, Dist. Palghar.

Respected Sir,

Please find enclosed herewith minutes of meeting of Public Hearing conducted at Village Ghonsai (Met-Naka) of M/s. Bhartiya Metacast Pvt. Ltd. Gut No. 179, 180, 182, 272, 273, 274 of Ghonsai (Met Naka) village, Tal. Wada, Dist. Palghar.

Submitted for information and further needful, please.

Sub Regional Officer, Kalyan III

**मेसर्स भारतीया मेटाकास्ट प्रा. लि. सर्व्हे नं. १७९, १८०, १८२, २७२, २७३, २७४ गांव घोनसाई (मेट नाका) भिंवडी, वाडा रोड, तहसिल वाडा, जिल्हा पालघर, द्वारे १,५०,००० मे. टन प्रति वर्ष च्या क्षमतेच्या एम. एस. बिलेट्स उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाच्या जनसुनावणीचे इतिवृत्त.**

---

मेसर्स भारतीया मेटाकास्ट प्रा. लि. या प्रकल्प धारकाने दि. १६.०८.२०१९ रोजी मप्रनि मंडळाकडे प्रस्तावित १,५०,००० मे. टन प्रति वर्ष क्षमतेच्या एम. एस. बिलेट्स तयार करण्याच्या प्रस्तावित प्रकल्पाकरिता पर्यावरण विषयक जनसुनावणीचे आयोजन करण्याबाबतचा अर्ज सादर केलेला आहे. MoEFCC, S.O 2566 (E) दि. १० ऑगस्ट २०१७ रोजीच्या राजपत्र अधिसुचने नुसार हा प्रकल्प वर्ग A मध्ये विचारात घेण्यात आला होता. पण Dy.C.F., जव्हार वन विभाग, जिल्हा पालघर Vide No. B/20 land/NOC/1265/2019-20, दि. २२.०७.२०१९ द्वारे जारी पत्रानुसार प्रस्तावित प्रकल्प क्षेत्र तानसा वन्य अभयारण्य पासून १२ कि. मी. अंतरावर असल्याने सदर प्रकल्प श्रेणी-B मध्ये विचारात घेण्यात आला.

सदर प्रस्तावित उदयोग पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार अनुसूची मध्ये “ब” वर्गात मोडतो. तसेच सदर उदयोगास पर्यावरण विषयक जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे. मा. जिल्हाधिकारी पालघर यांनी दि. ०९.११.२०१९ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची परवानगी दिली. मप्रनि मंडळाने दि. ०७.१०.२०१९ रोजीच्या दैनिक सकाळ (मराठी दैनिक) तसेच फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी दैनिक) मध्ये सदर पर्यावरण विषयक जनसुनावणी बाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण आघात मुल्याकंन व त्याचे इंग्रजी व मराठी सारांश, प्रकल्प विषयाचे इतर दस्ताऐवज, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जि. पालघर, जिल्हापरिषद, पालघर, जिल्हा उदयोग केंद्र, पालघर तसेच तहसिल कार्यालय, ता. वाडा, जि. पालघर, पंचायत समिती, ता. वाडा, जि. पालघर, प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, कल्याण, मप्रनि मंडळ मुख्यालय मुंबई, पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, घोनसाई मेट-नाका, ता. वाडा, जि. पालघर या कार्यालयात ठेवण्यात आले होते. सदर दस्ताऐवजाद्वारे संबंधित व्यक्तीना पर्यावरण आघात मुल्याकंन अहवालाची माहिती मिळावी व अभ्यास करता यावा या उद्देशाने वरील कार्यालयामध्ये जनतेस उपलब्ध करुन दिले होते. तसेच, संबंधितांना पर्यावरण विषयक सुचना / टिप्पणी / हरकती सादर करण्याची विनंती केली होती.

मेसर्स भारतीया मेटाकास्ट प्रा. लि. द्वारे १,५०,००० मे. टन प्रति वर्ष च्या क्षमतेच्या एम. एस. बिलेट्स उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाच्या जनसुनावणीचे सर्व्हे नं. १७९, १८०, १८२, २७२, २७३, २७४ गांव घोनसाई (मेट नाका) भिंवडी-वाडा रोड, तहसिल वाडा, जिल्हा पालघर येथे ९ नोव्हेंबर २०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता कारखान्याच्या वरील पत्त्यावर आयोजित केली होती.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयीन आदेश २०१९ चे ई-८१ च्या अंतर्गत पत्र क्रं. BO/JD (WPC) PH/B-४२२५ दिनांक ०५.११.२०१९, अनुसार जनसुनावणी करण्यासाठी समितीचे गठन खालील प्रमाणे करण्यात आली होती.

| | |
|---|---|
| **श्री. कैलाश शिंदे,<br>जिल्हादंडाधिकारी, पालघर** | अध्यक्ष |
| **श्री. शंकर वाघमारे,<br>प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कल्याण** | **सदस्य** |
| **श्री. राजेंन्द्र राजपुत,<br>उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कल्याण – ३** | **समन्वयक** |

कारखान्याचे प्रतिनिधी श्री. मांगीलाल एस. जैन आणि चिराग जैन यांनी माननीय अध्यक्ष व जनसुनावणी चे सदस्य यांचे स्वागत केले.

समन्वयक श्री. राजेंन्द्र राजपुत, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कल्याण-३, यांनी जनसुनावणी ची संक्षिप्त माहिती उपस्थित असलेल्या जनप्रतिनिधी, ग्रामस्थांना दिली.

तसेच केंद्र सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालयाच्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिनियम दि. १४.०९.२००६ तसेच सुधारित अधिनियम ११.११.२००९, ०१.१२.२००९ आणि २४.१२.२०१३ अन्वये ३०,००० मे. टन प्रति वर्ष पेक्षा जास्त लोह उत्पादन क्षमता असणा-या उदयोगांनी रितसर पर्यावरणीय परवानगी घेणे बंधनकारक आहे असे नमुद केले.

समन्वयक यांनी मा. अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, पालघर यांना पर्यावरण विषयक जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याची अनुमती घेवून प्रकल्प प्रवर्तकास पडदयावर सादरीकरण करण्यास सांगितले.

श्री. प्रदीप पिपलटकर, प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणास सुरुवात केली. सदर सादरीकरणा दरम्यान प्रस्तावित प्रकल्प १,५०,००० मे. टन प्रति वर्ष क्षमतेचा प्रकल्प गट क्रं. १७९, १८०, १८२, २७२, २७३, २७४ घोणसाई (मेट नाका) ता. वाडा, जि. पालघर येथे प्रस्तावित असून, MoEF&CC पर्यावरण व वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिलेल्या TOR (Terms of References) आणि त्यांचे अनुपालन संदर्भात माहिती दिली. सदर प्रकल्पास दररोज ५० हजार लीटर पाण्याची गरज असेल अशी माहिती दिली. तसेच विवरणात्मक उत्पादन प्रक्रिया, वापरण्यात येणारा कच्चा माल व कच्च्या मालाची मात्रा स्पष्ट केली. तसेच सदर उदयोगात प्रयोग शाळा सुविधा, उत्पादन साठवणूक सुविधा, मनुष्यबळ, सुरक्षा, संरक्षण उपाययोजना, हरितपट्टा विकास भू-वापराचे विवरण, तसेच घनकचरा हाताळणी व्यवस्थापनाच्या तरतुदी स्पष्ट केल्या. श्री. प्रदीप पिपलटकर यांनी प्रस्तावित प्रकल्पातुन होणारे वायु प्रदूषण नियंत्रणासाठी आधुनिक प्रदूषण नियंत्रण प्रणाली जसे Dish Antenna type fume Capturing hood सह बॅग फिल्टर, तसेच ३० मी. उंचीची चिमणी उभारणीचे प्रस्तावित आहे आणि CPCB / SPCB चे मुल्यांकन प्रमाणके पूर्ण करण्याकरिता चिमणीच्या वायु गुणवत्तेचे नियमित परीक्षण केले जाईल असेही नमुद केले. मनुष्यबळाच्या संदर्भात त्यांनी स्पष्ट केले की, सदर प्रकल्पाकरिता जवळपास २३० कुशल / अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. रुपये ४० करोडच्या गुंतवणुकी सह संयंत्रणामध्ये वाहनांच्या हालचालीमुळे होणारे धुळ उत्सर्जन टाळण्याकरिता ते जल फव्वारी यंत्रणेसोबत क्रॉंक्रीटचे रस्ते बांधण्यात येतील. दाट हरितपट्टा तयार करणे इत्यादीची तरतुद केली आहे.

श्री. प्रदीप पिपलटकर, यांनी वायुचा वेग, AAQM, ध्वनी पातळी, पाण्याची गुणवत्ता ( भुजल व भुपृष्ट जल) मृदाची पोत संभाव्य पर्यावरणीय प्रभाव आणि अवलंबलेल्या उपाययोजनेसह जवळपासच्या संबंधित क्षेत्राचे करण्यात आलेल्या पर्यावरणीय सर्वेक्षणाबद्दल स्पष्टता केली.

श्री. प्रदीप पिपलटकर, यांनी स्थानिक लोकांशी सुसंवाद करुन गावातील रस्ते, शाळा, शौचालय सुविधास सभोवताली गावाच्या विकासाकरिता रु. ८० लाख इतक्या निधीची तरतूद केली आहे असे सांगितले. प्रकल्पा संबंधित शासकीय विभागाद्वारे सर्व परवानगी प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प उभारणीचे काम पूर्ण करण्यात येईल असेही नमुद केले.

माननीय अध्यक्ष यांनी जनसुनावणी साठी उपस्थित लोकांना विनंती केली की त्यांनी त्यांचे आक्षेप / सूचना / तक्रारी लेखी किंवा तोंडी स्वरुपात या ठिकाणी देण्यात याव्यात.

१) श्री. विकास घरत, ग्रामपंचायत सदस्य यांनी सुचना केली की, कंपनी च्या पर्यावरण सल्लागारांनी प्रकल्पाच्या फायदयाविषयी स्पष्टीकरण दिले परंतु त्यांनी या प्रकल्पातील पर्यावरणीय दृष्टीकोणातुन होणा-या तोटयाबद्दल सर्वांना माहिती दयावी. प्रदीप पिंपलटकर यांनी उत्तर देताना नमुद केले की, उदयोगाने जल प्रदूषण नियंत्रणासाठी उदयोगातुन निघणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पुर्नवापर उदयोगातच केले जाईल. तसेच वायु प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभावी बॅग फिल्टर बसविण्याची व्यवस्था करण्यात येईल आणि ध्वनी प्रदूषणांवरील अभ्यासानुसार कंपनीने कार्यक्षम प्रदूषण नियंत्रण उपाययोजना करण्याचे प्रस्तावित आहे आणि प्रकल्प कार्य पूर्ण झाल्यानंतर पर्यावरण स्वच्छ ठेवण्याकरिता सर्व विहित प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची पूर्तता करण्यासाठी अधिक खबरदारी घेतील.

२) श्री. मंगेश चौधरी, ग्रामस्थ — यांनी माहिती दिली की ही कंपनी येथे मागील पंधरा वर्षापासुन स्थापन केली गेली आहे, आमचा अनुभव आहे की, या कंपनीने ध्वनी पातळी बद्दल कोणती काळजी घेतलेली नाही, रात्रीच्या वेळी कंपनीतील उत्पादन प्रक्रियेमुळे मोठया प्रमाणावर ध्वनी प्रदूषण होते. कंपनीतील सांडपाणी सभोवतालील शेतीमध्ये प्रवाहित होते आणि भारी वाहतुकीमुळी या क्षेत्रातील रस्ते जे खुप अरुंद आहेत ते खराब केलेले आहे आणि कंपनीने रस्ते दुरुस्त करण्याची किंवा बांधण्याची कोणती दखल घेतलेली नाही. उदयोगाने प्रस्तावित केलेल्या उपाय योजना प्रत्यक्षात अंमलात आणाव्यात. या रस्त्यांवर शाळेत जाणा-या मुलांचे व वृध्द लोकांना चालणे कठिण झाले आहे. परिसरातील शाळेत जाणा-या मुलांच्या बसेसला कंपनीच्या जड वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो व एखादा रुग्ण रुग्णवाहिकेतुन घेवून जाणे अडचणीचे ठरते. रोजगारा संदर्भात, स्थानिक लोकांना कमी प्रमाणात रोजगार मिळाला आहे, पण प्रकल्प प्रवर्तकाने बाहेरील राज्यातुन मुनष्यबळ मिळविला आहे. आम्ही प्रकल्प प्रवर्तकाला सहकार्य करण्यास तयार आहोत पण जर या समस्यांकडे दुर्लक्ष केले गेले तर या प्रकल्पा विरुध्द जन आंदोलनला तोंड देण्याची वेळ येवू नये.

श्री. मांगीलाल जैन प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की, आम्ही सहमत आहोत की, अस्तित्वात असलेला रस्ता खुपच अरुंद आहे, स्थानिक रहिवाशांना होणा-या गैरसोयी टाळण्यासाठी गंभीरपणे घेवू आम्ही रस्ता दुरुस्ती करण्याची खात्री देतो आणि तसेच रस्ता रूंदीकरणाची

शक्यता असल्यास सहाय्य करु व प्रदुषण विषयक प्रस्तावित उपाय योजना प्रत्यक्ष अंमलबजावणी करुन योग्य ती काळजी घेण्यात येईल.

३) श्री. दिलीप पाटील यांनी असे नमुद केले की, सदर रस्ता जिल्हा परिषदेचा आहे, त्यामुळे उदयोग सदर रस्त्याचे रुंदीकरण कसे काय करु शकते?

सदर बाबत माननीय अध्यक्ष यांनी विचारले की, तो रस्ता ग्रामीण आहे का? तसेच नमूद केले की ३ मी. पेक्षा जास्त बाजुला पण आपण जमीन घेतलेली असते, पण आपण पूर्ण जागेत रस्ता करत नाही तसेच रस्ताा मोजणीसाठी बी. डी. ओ यांना बोलावले असल्याचे सांगितले. तसेच कमीत कमी ५ मी. चा रस्ता असला पाहिजे जेणेकरुन दोन्ही बाजुने गाडया इकडे तिकडे गेल्या पाहीजे असेही नमुद केले. तसेच रस्ता सिमेंट क्राँक्रीटचा करण्याचे निर्देश त्यांनी प्रकल्प प्रवर्तकाला दिले. त्यांनी पुढे प्रकल्प प्रवर्तकास सुचित केले की, डांबरी रस्ता केल्यास तो वारंवार खराब होवुन दुरुस्त करावा लागतो. तसेच प्रकल्प प्रवर्तकास मोठा रस्ता गरजेचे असल्या कारणाने रस्ता रुंदीकरणासाठी बाजुची जमीन संपादित करण्याची गरज असेल तर प्रकल्प प्रवर्तकाने संबंधित शेतक-याकडुन जमीन घ्यावी, असेही निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. त्यासाठी शेतक-यांची फार जमीन जाणार नाही असेही नमुद केले.

४) श्री. दिलीप पाटील (ग्रामपंचायत उपसरपंच) – सदर उदयोग गट क्रं. . १७९, १८०, १८२, २७२, २७३, २७४ घोणसाई (मेट नाका) ता. वाडा, जि. पालघर येथे प्रस्तावित असून, सदर जागा गावठांणापासुन ३९५ मी. दूर आहे. शासनाच्या नियमानुसार गावठांणापासुन ५०० मी. पर्यंत परवानगी देण्यात येत नाही. तसेच सदर उदयोग तानसा नदीपासुन ८०० मी. अंतरावर आहे. उदयोगाच्या लगत नाला आहे आणि उदयोगातील प्रदूषक घटक सदर नाल्यात जातील आणि पर्यायाने नदीत मिसळतील याचा गंभीर परिणाम शेतक-यांना व जनावरांना होवू शकतो. कंपनीपासुन ३७५ मी. अंतरावर जिल्हा परिषदाची शाळा आहे उदयोगाच्या प्रदूषणाचा परिणाम विदयार्थ्यांचा आरोग्यावर दुषपरिणाम होवू शकतो. उदयोगापासुन २५ मी. व ५० मी. पुढे गेल्यावर २२ मी. अंतरावर लोक राहतात त्यांना प्रदूषणाचा त्रास होतो. तसेच कंपनीमध्ये सुमारे १२५ कामगार हे परप्रांतातुन आलेले आहे. फक्त दोन स्थानिक कामगार उदयोगामध्ये काम करतात आणि पुढे असे नमुद केले की या उदयोगाला दररोज सुमारे ५० हजार लीटर पाणी लागणार आहे. सदर पाणी हे त्याच्या कुपनलिकेतुन उपासा करणार आहे याचा परिणाम गावातील भुजल पातळी कमी होईल. सदर उदयोगामुळे जल, वायु, ध्वनी प्रदूषण मोठया प्रमाणावर होणार आहे यांचा दुषपरिणाम वयोवृध्द व स्थानिक नागंरिकावर तसेच

पर्यावरणावर होणार असल्यामुळे सदर उदयोगास परवानगी देण्यात येवू नये. उदयोगातुन निघणा-या सांडपाण्यामुळे उदयोगा लगतच्या शेत जमिनीचे नुकसान होत आहे. सदर उदयोगाने नमुद केले आहे की, आम्ही हरितपट्टा तयार करु पण सदर उदयोगात हरितपट्टयासाठी जागा उपलब्ध नाही. सदर उदयोग गेल्या पंधरा वर्षापासुन येथे कार्यरत आहे. तरी उदयोगात पंधरा झाडे नाहीत याचा अर्थ उदयोग गावक-यांची धुळफेक करत आहे. सदर उदयोगातील प्रवर्तन भट्टी मध्ये १६५०°C तापमानावर लोह वितळवले जाईल आणि सदर तापमानामुळे सभोवतालील हवेचे तापमानात वाढ होईल त्याची जळ नागरिकांना लागणार आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. ग्रामस्थांच्या वतीने मी आपणांस विनंती करतो की, या उदयोगास कोणतीही परवानगी देण्यात येवू नये.

श्री. प्रदीप पिंपलटकर – पर्यावरण सल्लागाराने उत्तर दिले की, उदयोगापासुन तानसा नदी ८०० मी. अंतरावर आहे. या प्रकल्पामध्ये पाण्याचा वापर प्रामुख्याने कुलींग करीता व घरगुती वापराकरिता आहे आणि कुलींगसाठी वापरलेल्या पाण्याचे पुर्नचक्रण केले जाईल. सदर उदयोगातुन कोणत्याही प्रकारचे औदयोगिक सांडपाणी निर्माण होणार नाही तसेच वायु प्रदूषणाच्या समस्ये संदर्भात, क्षेत्रातील वायु गुणवत्ता टिकवून ठेवण्याकरिता आम्ही ३० मीटर उंचीची चिमणी आणि वायु प्रदूषणाच्या समस्या नियंत्रित करण्याकरिता अत्याधुनिक आणि कार्यक्षम वायु प्रदूषण नियंत्रण प्रणाली प्रस्तावित आहे. त्यांनी स्पष्ट केले की, सदर प्रणालीच्या उपयोगाने हवेचे प्रदूषण ९९ % कमी केले जाईल. त्यामुळे उदयोगामुळे होणा-या हवा प्रदूषणाची मात्रा नगण्य राहील. तसेच, उदयोगासाठी एकूण जागेच्या ३३% इतकी जागा हरितपट्टयासाठी राखीव ठेवणे अनिवार्य आहे आणि हरितपट्टा निर्माण केल्याशिवाय उदयोगास परवानगी मिळणार नाही.

५) श्री. दिलीप पाटील घोनसाईचे रहिवासी – त्यांनी स्पष्ट केले की, जवळपासच्या गावातील बरीच इन्गोट बनवणारी कारखाने सुरु झाली व प्रदूषण समस्येमुळे आंदोलन करुन बंद पाडली.

६) श्री. मांगीलाल जैन प्रकल्प प्रवर्तक – यांनी उत्तर दिले की, जे उदयोग बंद झाले ते आर्थिक अडचणीमुळे, प्रदूषणाच्या समस्येमुळे नाही.

७) श्री. अशोक घोरपणे ग्रामपंचायत सदस्य – यांनी स्पष्ट केले की, या उदयोगाद्वारे नविन बोअरवेल केल्यामुळे आणि ५०००० लीटर प्रतिदिन इतके भुजल काढल्यामुळे

ग्रामपंचायतीच्या बोअरवेल मधील पाण्याची पातळी खोल गेली आहे आणि रहिवाश्यांना वॉटर टँकर द्वारे पाणी पुरवठा करण्याकरिता ग्रामपंचायतीला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अलीकडच्या काळात सदर ग्रामपंचायतीस १,९९,३८५ हजार रुपये इतका खर्च पाणी पुरवण्यासाठी झाला असुन भविष्यात पाण्याची समस्या उद्भवणार आहे. दुसरा मुद्दा, सदर उदयोग दावा करते की, ते हरितपट्टा विकसित करतील, पण जेव्हा त्यांच्याकडे पुरेशी जागा उपलब्ध नाही तर ते हरितपट्टा कसे तयार करणार. आतापर्यंत, उदयोगाने स्थानिक लोकांना सध्या चालू असलेल्या रोलिंग मिल मध्ये रोजगार उपलब्ध करुन दिला नाही सदर उदयोगामध्ये एकूण कामगारापैकी ८०% कामगार स्थानिक असणे गरजचे आहे. सदर उदयोगाचे सांडपाणी जवळपासच्या शेत जमीनीमध्ये जाते, यामुळे आम्ही नविन प्रकल्पास विरोध करीत आहोत.

८) श्री. दिलीप पाटील घोनसाई रहिवासी – म्हणाले की, या प्रकल्पास शासनाद्वारे अनुदान मिळते, ते शासनाच्या अनुदानाचा उपभोग घेत आहेत पण सभोवतालील पर्यावरणाच्या विकासाला किंवा स्थानिक रहिवाश्यांच्या उपयोगासाठी अनुदानाचा कोणताही फायदा होत नाही आणि यामुळेच या प्रस्तावित प्रकल्पास आमचा विरोध आहे.

९) श्रीमती. साधना जयवंत पाटील (स्थानिक रहिवासी) – यांची तक्रार आहे की, कंपनीतील सांडपाणी त्यांच्या शेत जमीनीत जाते. या कारणाने त्यांना दर वर्षी आर्थिक नुकसान होत आहे.

माननीय जिल्हाधिकारी - यांनी प्रकल्प प्रवर्तकाला विचारले की, कंपनीतील सांडपाणी श्रीमती साधना जयवंत पाटील यांच्या शेत जमिनीत का जाते ? जर असे असेल तर ते टाळण्याकरिता आपण खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्यांनी श्रीमती. साधना जयवंत पाटील यांना विचारले की जे पाणी तुमच्या जमिनीत जाते ते नैसर्गिक जलस्त्रोत आहे किंवा कंपनीचे सांडपाणी आहे हे खात्री करुन घ्या. माननीय जिल्हाधिकारी यांनी प्रकल्प प्रवर्तकाला सुचित केले की, शेत जमिनीत शिरणारे पाणी हे काळया रंगाचे आहे आणि यांची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी प्रकल्प प्रवर्तकावर आहे आणि त्यांनी कोणात्याही प्रकारचे सांडपाणी जमिनीत शिरु नये याची काळजी घ्यावी.

श्री. मांगीलाल जैन प्रकल्प प्रवर्तक – यांनी सांगितले की, श्रीमती साधना जयवंत पाटील यांच्या शेत जमिनीत शिरणारे पाणी हे स्थानिक नाल्यातील आहे आणि पावसाचे पाणी

नाल्याद्वारे त्यांच्या शेत जमिनीत जाते. कंपनीचे सांडपाणी जवळपासच्या ठिकाणी जावू नये या करिता जबाबदारी घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

१०) श्री. सुरेश विठठल भोईर शिवनेरी भुमीपुत्र कामगार संघटना अध्यक्ष – यांनी सुरक्षा उपायांबद्दल तक्रार केली हया कंपनीद्वारे कोणतीही सुरक्षा साधणे देण्यात येत नाही आणि कंपनीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांचा आरोग्य सुरक्षिततेची काळजी घेतली जात नाही. तसेच जवळपासचे गावक-यांना कंपनीत रोजगार देण्यात येत नाही. सदर उदयोगात ग्रामस्थांना रोजगार मिळणार नसेल तर आमचा या उदयोगास विरोध आहे.

११) श्री. नरेश तुकाराम घोडविंदे स्थानिक रहिवासी – म्हणाले की, स्थानिक लोकांना योग्य रोजगार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कंपनी पार पाडत नाही. कंपनी स्थानिक लोकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतुेनसार रोजगार देत नाही तर अयोग्य कामगारांना रोजगार देत आहेत. त्यांनी माननीय जिल्हाधिका-यांना विनंती केली की, मा. जिल्हाधिकारी यांनी हमी दयावी की, कपंनी त्यांचे आश्वासन पाळेल, तरच सदर उदयोगास परवानगी देण्यात यावी.

१२) भाई गंगाराम शेलार – म्हणाले की, उदयोगामुळे होणा-या ध्वनी प्रदूषण व वायु प्रदूषणामुळे आमच्या परिसरात दुषित धुर पसरतो. तरी मा. जिल्हाधिकारी साहेब या त्रासांची जबाबदारी घेतील का?

१३) श्री. हरीभक्त कोलू पाटील – श्री. पापाजी मांगीलाल जैन हे स्थानिक उत्साहासाठी देणगी देतात हनुमान जयंती, दुर्गा उत्साह, गणपती उत्साह आणि सप्ताहांच्या उत्सावासाठी देणगी देवुन सहकार्य करतात. गावात चांगला प्रोजेक्ट येतो हे चांगली गोष्ट आहे.

१४) श्रीमती. दिपाली दिलीप पाटील ग्रामपंचायत सदस्य – यांनी सांगितले की, आमचा विद्दमान प्रकल्पाला पाठिंबा आहे पण प्रस्तावित प्रकल्पाला विरोध आहे. कृपया करुन गैरसमज करुन घेवू नये जो उदयोग चालु आहे तो चालु राहू दया आमचा नवीन उदयोगाला विरोध आहे.

श्री. मंगीलाल जैन प्रकल्प प्रवर्तक – यांनी स्पष्ट केले की, आम्ही नेहमी आमच्या उणीवांचे स्वागत करतो आणि त्या लक्षात आणून दिल्याबद्दल त्यावर योग्य कार्यवाही करु. आम्ही स्थानिक लोकांना रोजगार देण्याचा प्रयत्न करतो पण आम्हाला प्रतिसाद मिळत नाही. आम्ही आमच्या गरजेप्रमाणे कर्मचा-यांची नेमणूक करतो. आम्ही हे मान्य करतो की, आमच्या उदयोगामध्ये काम अधिक कठिण स्वरुपाचे आहे तसेच उष्ण वातावरणात काम करावे लागेल.

आम्ही स्थानिक लोकांना प्रशिक्षण देवून उदयोगामध्ये काम करण्याची योग्यता निर्माण करण्यास तयार आहोत. आम्ही फक्त स्थानिक लोकांना रोजगार आणि विविध कामांचे कंत्राट देण्यास तयार आहोत.

१५) श्री. दयानंद पाटील उपसरपंच ग्रामपंचायत – प्रस्तावित उदयोगाला विरोध करण्याचा ग्रामपंचायतीत कोणताही निर्णय झालेला नाही. कंपनी स्थानिक लोकांना रोजगार देण्यास सहमत असेल आणि कंपनी पर्यावरणास धोका निर्माण करणा-या सर्व बाबींना नियंत्रित करण्याकरिता योग्य ती काळजी घेण्यात यावी आणि रस्त्यांचे बांधकाम करण्यात यावे, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट आणि वायु प्रदूषण नियंत्रणाची व्यवस्था करावी. उत्सव कार्यक्रमासाठी उदयोगाकडून वेळोवेळी मदत होते. फक्त विरोध करायचा म्हणून मी विरोध करत नाही. गावात नवीन उदयोग येत आहे जेणेकरुन ग्रामपंचायतीचा महसूल वाढणार आहे, ही बाब ग्रामपंचायतीच्या फायदयाची आहे. उदयोगाने प्रदूषण नियंत्रण ठेवण्याची श्वाशती दिली तर आमचा उदयोगास पाठिंबा राहील.

१६) श्रीमती. मयुरी पाटील स्थानिक रहिवासी, घोणसाई गांव – येथे जमलेला महिला वर्ग एवढयासाठी आला आहे की, या उदयोगामुळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल आणि उदयोगाने नमुद केल्याप्रमाणे प्रदूषण नियंत्रणाची संपुर्ण उपाययोजना सदर उदयोग करणार असेल तर या उदयोगास आमचा पाठिंबा आहे.

१७) श्री. रोहिदास राऊत – सदर उदयोगाने गेल्या पंधरा वर्षात येथील स्थानिक लोकांना किती रोजगार दिला आहे एवढे स्पष्ट करावे.

१८) श्री. किशोर पाटील – प्रस्तावित कंपनीच्या प्रस्तावाकरिता स्थानिकचा पाठिंबा आहे.

१९) श्री. भावेश पाटील स्थानिक रहिवासी – स्पष्ट केले की, हा प्रकल्प अदयाप सुरु झाला नाही आणि आधीच विरोध करणे योग्य नाही. या उदयोगात माझा सखा भाऊ बरीच कामे करतो त्यामुळे सदर उदयोगामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होत नाही असे म्हणणे योग्य नाही. तसेच जर सदर उदयोगाने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता केली नाही तर विरोध करणे योग्य ठरेल.

२०) श्रीमती स्नेहल पाटील स्थानिक रहिवासी घोणसाई गांव–सदर उदयोगामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे भविष्यात प्रकल्प प्रवर्तकाने नागरिकांची योग्यता तपासून त्यांनी रोजगारांची संधी उपलब्ध करुन देण्यात यावी.

२१) श्री. अमित शिर्के माजी ग्रामपंचायत उपसरपंच – यांनी स्पष्ट केले की, मी येथे २०११ पासुन आहे. मला सभोवतालील ब-याच उदयोगांचा अनुभव आहे, त्यांनी सांगितले की अतिवृष्टीमुळे रस्ते खराब झाले आहेत. कंपनीने रस्ता दुरुस्त करण्याचे प्रयत्न केले आहेत, यामुळे हया प्रकल्पास येऊ दयावे. स्थानिक लोकांना या प्रकल्पाचा फायदा होईल आणि कंपनीने सर्व पर्यावरणीय अटी व शर्तीचे पालन करावे.

२२)श्री. मुकेश पाटील स्थानिक रहिवासी – यांनी उच्च तापमान भट्टी संदर्भात प्रश्न उपस्थित केला ज्यामुळे सभोवतालील पर्यावरणाचे तापमान वाढेल, त्यांनी स्थानिक सुशिक्षित लोकांना आपल्या कार्यालयात रोजगार देण्यावर जोर दिला. उष्ण तापमान वातावरणात काम करणा-या कामगारांची कंपनीने काळजी घ्यावी. स्थानिकांना फक्त लोखंड उचलणे एवढीच कामे देणार का? स्थानिकांना त्यांच्या योग्यतेनुसार काम देण्यात यावे.

उदयोगांचे पर्यावरण सल्लागार श्री. पिपलटकर यांनी स्पष्ट केले की, हवेतील तापमान वाढणार नाही या दृष्टीने सयंत्रणा बसविण्यात येईल तसेच कामगारांना सुरक्षा उपकरणे पुरविण्यात येतील.

माननीय जिल्हाधिका-यांनी कंपनीच्या संचालकांना या प्रश्नाचे स्पष्टीकरण देण्यास सांगितले.

श्री. दिनेश जैन प्रकल्प प्रवर्तक – यांनी स्पष्ट केले की, स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यास स्थानिक लोकांना उचित शिक्षणाची सोय केली जाईल. स्थानिक लोकांना तांत्रिक शिक्षणाकरिता सहाय्य करु. सध्या मजुरांकरिता स्थानिक लोक उपलब्ध नाहीत. आम्ही कंपनीमध्ये नोकरी देण्याकरिता योग्य प्रशिक्षण दिल्या नंतर रोजगार उपलब्ध करुन देवूत, आम्ही आमच्या कंपनी करिता कुशल कामगार तयार करण्याचे प्रयत्न करु आणि केवळ स्थानिक लोकांना वेगवेगळया कामाचे कंत्राट देण्यास सहकार्य करण्यास तयार आहोत.

२३) श्री. केतन पाटील सदस्य रहिवासी – यांनी माहिती दिली की, B.S.C. पदवीधर आहेत आणि कंपनीच्या प्रयोग शाळेत नोकरीची संधी मिळण्याची अपेक्षा आहे.

श्री. चिराग जैन प्रकल्प प्रवर्तक – यांनी सांगितले की, या प्रकल्पाच्या मंजुरी नंतर प्रयोग शाळा स्थापित केले जाईल आणि आम्ही प्रयोग शाळेत नोकरीकरिता योग्यता असलेल्या व्यक्ती विचारात घेऊ.

२४) श्री. मनोज घरत स्थानिक रहिवासी – यांनी कंपनीने बनविलेल्या ३०-३५ बोअरवेल बद्दल काळजी व्यक्त केली आणि इतक्या मोठया संख्येने बोअरवेल तयार केल्यामुळे परिसरातील बोअरवेल मध्ये पाणी पुरवठा टंचाई निर्माण झाली आहे. यासोबतच कंपनी मोठया प्रमाणात कच्चामाल आणि तयार उत्पादन अशा अरुंद आणि खराब झालेल्या रस्त्याद्वारे कसा आणेल. कंपनीने गावातील रस्त्यांची जबाबदारी घेणार का ? इत्यादी प्रश्न विचारले.

शंकर वाघमारे, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, कल्याण यांनी मा. जिल्हाधिका-यांचे या जनसुनावणी ला आपला अमुल्य वेळ दिल्या बद्दल आभार मानले तसेच जनसुनावणी करिता उपस्थित असलेले उप विभागीय अधिकारी (प्रांत), तहसिलदार वाडा आणि इतर उपस्थित असलेल्याचे आभार मानले. त्यांनी या जनसुनावणीचा उद्देशाबद्दल सांगितले की हया प्रकल्पाला ही जनसुनवाणीची समिती परवानगी देत नाही. या समितीपुढे येणारे तुमचे मुद्दे, आक्षेप, टिका-टिप्पणी, सुचना व संभाषण नोंदवण्यात आले आहे आणि तसेच या जनसुनावणीचे चित्रीकरण करण्यात आले आहे. हे सर्व दस्ताऐवज वातावरणीय बदल मंत्रालय भारत सरकार (MoEF&CC) यांना कळविण्यात येईल आणि या प्रस्तावित प्रकल्पाला परवागनी देण्याच्या निर्णयाबाबत विचार करेल.

शेवटी माननीय जिल्हाधिकारी, पालघर यांनी या जनसुनावणीचे उद्दिष्ट स्पष्ट केले आणि प्रकल्प प्रवर्तकाला पाणीपुरवठा, विद्यमान रस्त्यांची दुरुस्ती आणि देखरेख, ध्वनी आणि वायु प्रदूषणाकरिता खबरदारी आणि प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर रोजगाराच्या संधीचा विचार करण्याचे निर्देश दिले त्यांनी असेही सांगितले केले की, ही जनसुनावणी म्हणजे या प्रकल्पाची परवानगी नसून आपले म्हणणे, मत आणि अपेक्षा विचारात घेण्यात आलेले आहे.

माननीय अध्यक्ष यांनी लोकांना सांगितले की, आपले काही सुचना असल्यास मेल किंवा टपालद्वारे पाठवू शकता. माननीय अध्यक्ष यांनी चर्चेचा समारोप केला आणि जनसुनावणी पूर्ण झाल्याचे जाहीर केले.

**निष्कर्ष**

मेसर्स भारतीया मेटाकास्ट प्रा. लि. द्वारे प्रस्तावित १,५०,००० मे. टन प्रति वर्ष च्या क्षमतेकरिता बिलेट तयार करण्याचा प्रकल्पाकरिता जनसुनावणी सर्व्हे नं. १७९, १८०, १८२, २७२, २७३, २७४ गांव घोनसाई (मेट-नाका) भिंवडी वाडा रोड, तहसिल वाडा, जिल्हा पालघर.

जनसुनावणी मध्ये लोकप्रतिनिधी आणि गावकरी सहभागी झाले आणि त्यांनी प्रकल्पाच्या संदर्भात अपेक्षा आणि आक्षेप व्यक्त केले. अध्यक्ष व जनसुनावणी समिती सदस्य यांनी लोकप्रतिनिधी व गावकरी यांचे विरोध, सुचना व अपेक्षा इत्यादी बाबतची नोंद केली. अध्यक्षांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना जनसुनावणीचे इतिवृत्त तयार करण्यास सुचना दिल्या आणि सर्व संबंधित अधिका-यांना ते पुरविण्यास सांगितले आणि आभार मानून जनसुनावणीची संपन्न झाल्याचे जाहिर केले.

| | | |
|---|---|---|
| (श्री. राजेन्द्र राजपुत) | (श्री. शंकर वाघमारे) | (श्री. कैलाश शिंदे) |
| समन्वयक | सदस्य | अध्यक्ष |
| तथा उप प्रादेशिक अधिकारी, | तथा प्रादेशिक अधिकारी, | तथा जिल्हादंडाधिकारी, पालघर |
| मप्रनि मंडळ, कल्याण ३ | मप्रनि मंडळ, कल्याण | |